I.O. करीता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** अहमदनगर कॅम्प

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0634 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/12/2022 16:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 17/10/2022
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/10/2022
**Time From (वेळेपासून):** 14:56 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/12/2022 **Time (वेळ):** 15:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 024
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/12/2022 15:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वस्तु व सेवा कर विभाग अहमदनगर,कार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** इरफानखान यासीन पठाण
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मोहरी ता पाथर्डी जि अहमदनगर ,अहमदनगर कॅम्प,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | मोहरी ता पाथर्डी जि अहमदनगर ,अहमदनगर कॅम्प,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9822758690

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती सारीका जयवंत निकम | | | 1. वस्तु व सेवा कर विभाग,,, अहमदनगर,अहमदनगर कॅम्प, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

मी इरफानखान यासीन पठाण वय.30 वर्षे, धंदा-सौर उर्जा फिटींग (आस्थापक) रा. मोहरी ता. पाथर्डी जि. अहमदनगर मो नं 9822758690

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर कुटंूबासह राहण्यास असुन मी सौर उर्जा फिटिंग चे काम करतो. मी दि.17/10/2022 रोजी अॅन्टी करप्षन ब्युरो, अहमदनगर चे पोलीस निरीक्षक श्री. गोर्डे यांचेषी संपर्क करून त्यांना एका लोकसेविका विरूध्द लाचमागणीची तक्रार सांगितली होती. त्याप्रमाणे दिनांक 17/10/2022 रोजी दुपारी एक वा.चे सुमारास मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर कार्यालय येथे हजर झालो. तेथे पोलीस निरीक्षक श्री. गोर्डे यांनी मला त्यांची स्वतःची, त्यांचे स्टाफची, तसेच पंच म्हणुन जिल्हा परीशद अहमदनगर यांचेकडील कर्मचारी यांची ओळख करून देवुन, त्यांनी माझी ओळख करून घेतली. त्यानंतर पो.नि.श्री. गोर्डे यांनी पंचाना दिलेल्या सुचनेवरून, पंचांनी मला माझे नांव पत्ता विचारून माझी तक्रार विचारली असता मी माझे पुर्ण नांव पत्ता सांगुन माझी तक्रार सांगितली ती, मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन मागील दोन वर्षापासुन सौर उर्जा फिटिंगचे कामकाज करतो. मागील 06 महिन्यापुर्वी मी उद्यम आधार या शासकिय वेबसाईटवर याचे रजिस्ट्रेशन केलेले आहे. तसेच सदर व्यवसायाच्या अनुषंगाने मी मागील 7-8 महिन्यापुर्वी वस्तु व सेवा कर भवन अहमदनगर या कार्यालयातुन जीएसटी नंबर 27ठैक्च्च्6890थ्1ठ असा प्राप्त केला होता. माझ्या आजारपणामुळे मी शासकिय नियमाप्रमाणे रिटन्र्स फाईल करू शकलो नाही. सदर जीएसटी नंबर घेतला तेव्हा माहिती फार्म मध्ये माझे सी.ए. यांचा ई-मेल आय डी नमुद केलेला असल्यामुळे मला ई-मेल प्राप्त झाला नाही. मी शुक्रवार दिनांक 07/10/2022 रोजी माझे सी.ए श्री. अनिकेत आंधळे यांच्या कार्यालयात जावुन भेट घेतली व रिटर्न भरण्याबाबत चर्चा केली त्यावेळी त्यंानी त्यांच्या ई-मेल आय डी व माझ्या जीएसटी नंबर बाबतचा आलेल्या ई-मेल ची प्रिंट काढुन दिली. त्यामध्ये मी 27/07/2022 च्या नोटीसला रिप्लाय दिला नाही म्हणुन दिं. 10/08/2022 रोजी आॅर्डर फाॅर कॅन्सलेशन आॅफ रजिस्ट्रेशन असे नमुद असलेला माझा जीएसटी नंबर रदद केलेेबाबतचा ई-मेल मला प्राप्त झाला. त्यानंतर मी दिं. 12/10/2022 रोजी माझा जीएसटी नंबर पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी सबंधित टॅक्स आॅफिसर श्रीमती सारीका जयवंत निकम यांना भेटुन सदरबाबत अर्ज दिला,त्यावेळी त्या मला म्हणाल्या तुमचा जीएसटी क्रमांक रदद झाला आहे. तो पुन्हा चालु करायचा असेल तर तुम्ही मला 5,000/- रूपये दया, नाहीतर सदर प्रकरण मी नाशिक येथील वरीष्ठ कार्यालयात पाठविते. त्यामुळे माझ्या असे लक्षात आले की,श्रीमती सारीका निकम मॅडम या माझ्याकडे माझ्या वर नमुद कामासाठी 5000/- रूपये लाच मागणी करत आहे. त्यांना मी 5000/- रूपये दिले नाहीत तर त्या माझा जीएसटी नंबर पुन्हा कार्यान्वित करणार नाहीत अशी माझी खात्री झाली आहे. मी आज दिनांक 17/10/2022 रोजी श्रीमती सारीका निकम मॅडम यांची भेट घेवुन माझ्या कामाबाबत चर्चा करणार आहे. त्या चर्चे दरम्यान श्रीमती सारीका निकम मॅडम यांनी लाच मागणी केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार सागितली. त्यानंतर पो.नि.श्री. गोर्डे यांनी मला माझी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून देणेबाबत कळविले असता, मी माझे स्वहस्ताक्षरात तक्रार लिहीली ती मी वाचून पाहुन त्यावर सही केली. मी तोंडी सांगीतलेली तक्रार व लिहुन दिलेली तक्रार ही एकच असल्याची खात्री करून त्या तक्रारीवर दोन्ही पंचानी व पो.नि. श्री. गोर्डे यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी श्रीमती निकम यांचेविरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पो.नि.श्री. गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकाॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याचा वापराबाबत व हाताळणीबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पो.नि.श्री. गोर्डे यांनी व्हाईस रेकाॅर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून,व्हाईस रेकाॅर्डर चालू करून,त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकाॅर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर व्हाइ्रस रेकाॅर्डर सुरु करून त्यामध्ये पोनि श्री. गोर्डे, दोन्ही पंच व माझे निवेदन रेकाॅर्ड करण्यात आले. त्यानंतर पो.नि.श्री. गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे

कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पो.नि.श्री. गोर्डे यांनी व्हाईस रेकाॅर्डर चालु करून माझ्या ताब्यात दिले व पंच नं.1 सह मला श्रीमती निकम यांची भेट घेण्यासाठी वस्तु व सेवा कर कार्यालय, अहमदनगर येथे माझेकडील मोटार सायकलवर रवाना केले. त्याप्रमाणे मी पंच नं.1 यांचेसह वस्तु व सेवा कर भवन, अहमदनगर कार्यालय येथे जावून श्रीमती निकम यांची भेट घेतली असता, श्रीमती निकम यांनी माझ्याकडे माझा बंद झालेला जीएसटी क्रमांक पुन्हा कार्यान्वित करण्याचे कामाबाबत चर्चा केली व त्या चर्चे दरम्यान माझा जीएसटी क्रमांक पुन्हा कार्यान्वित करुन देण्यासाठी श्रीमती निकम मॅडम यांनी माझ्याकडे 4000/- रू. लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना लगेच करतो असे सांगुन मी व पंच नं.1 असे माझे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहमदनगर येथे परत आलो.

त्यानंतर तेथे पो.नि.श्री. गोर्डे यांनी माझ्याकडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला. माझे सोबत आलेले पंच नं. 1 यांना माझे सोबत श्रीमती निकम यांची भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यंतच्या घडले घटनेबाबत विचारले असता त्यांनी व मी वरील प्रमाणे हकिकत सांगीतली. त्यानंतर पो.नि.श्री. गोर्डे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकाॅर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाशण ऐकले. त्यातील संभाशण हे मी व पंच नं. 1 यांनी कथन केले हकिकती प्रमाणे असल्याचे खात्री झाली. त्यामध्ये श्रीमती निकम यांनी माझ्याकडे माझा बंद झालेला जीएसटी क्रमांक पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी 4,000/- रू. लाचेची मागणी केली असल्याने निशपन्न झाल्याने श्रीमती निकम यांचे विरूध्द लाचेचा सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले. त्यावेळी मला अस्वस्थ वाटत असल्यामुळे व दिनांक 18.10.2022 रोजी जवळच्या नातेवाईकाचे लग्न असल्यामुळे सदर सापळा कारवाई दिनांक 19.10.2022 रोजी आयोजीत करावी असे सांगीतले त्यामुळे सदर दिवषी लाचेची सापळा कारवाई करण्यात आली नाही.

त्यानुसार मी दिनांक 19.10.2022 रोजी 10.00 वाजेचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर कार्यालयात हजर झालो, पो.नि.श्री. गोर्डे, त्यांचा स्टाफ व दोन्ही पंच हजर होते. त्यावेळी पो.नि.गोर्डे यांनी मला श्रीमती निकम यांना लाच म्हणुन देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी हजर केलेेले 4000/- रूपये, त्यात 500/- रु. दराच्या 08 भारतीय चलनी नोटा असे समक्ष हजर केले. त्यानंतर अॅन्थ्रासिन पावडरचा वापर, गुणधर्म व अ.व्हा दिव्या बाबत मला व पंचाना माहीती देवुन प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोना चैधरी यांनी अॅन्थ्राॅसिन पावडर लावली व नोटांची घडी माझे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिषात ठेवुन दिली. तसेच त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला सापळा कारवाई सबंधी सुचना देण्यात आल्या व श्रीमती निकम यांनी अथवा त्यांनी सांगीतलेल्या इसमाने लाच मागणी केल्यास डोक्यावर हात फिरवुन इषारा करण्याची सुचना दिली.

त्यानंतर वस्तु व सेवा कर विभाग अहमदनगर कार्यालयात श्रीमती निकम यांचेविरुध्द लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. त्याप्रमाणे पोनि श्री. गोर्डे यांनी व्हाईस रेकाॅर्डर सुरू करून माझ्याकडे दिला, मला व पंच नं.1 यांना श्रीमती निकम यांची भेट घेण्यासाठी वस्तु व सेवा कर विभाग अहमदनगर कार्यालय येथे माझे कडील मोटार सायकलवरून रवाना केले. आमचे पाठोपाठ पो.नि. श्री. गोर्डे व सापळा पथक त्यांचेकडील शासकिय वाहनाने निघाले, मी पंचासह वस्तु व सेवा कर विभाग अहमदनगर कार्यालया समोरील आवारात पोहोचलो. त्यानंतर सापळा पथक माझे पाठोपाठ आल्याची खात्री केली. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे श्रीमती निकम यांचे कार्यालयात गेलो परंतु श्रीमती निकम हया कार्यालयात उपस्थित नव्हत्या, त्यामुळे मी तेथे बाजुुच्या टेबलवरील काम करणाÚया इसमास निकम मॅडम कुठे आहे असे विचारले असता त्या रजेवर असल्याचे त्यांनी सांगीतले,त्यामुळे मी कोणताही इषारा न करता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय,अहमदनगर येथे परत आलो,सापळा पथक देखील आमचे मागोमाग आले. पो.नि.गोर्डे यांनी माझ्याकडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला. त्यावेळी मी व पंच नं 1 यांनी निकम मॅडम रजेवर असले बाबतची माहिती पो.नि.गोर्डे यांना दिली.त्यानंतर माझ्या खिष्यातील लाच रक्कम पोना चैधरी यांनी ताब्यात घेतली व सुरक्षीत बॅगमध्ये ठेवुन दिली.त्यानंतर निकम मॅडम कार्यालयात हजर झाल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा आयोजित करण्याचे ठरविण्यात आले होते. मध्यंतरीच्या काळात माझ्या वडीलाची प्रकृृती खराब असल्यामुळे मी कारवाई कामी हजर राहु षकलो नव्हतो.

त्यानंतर माझ्या वडीलाची प्रकृृती थोडी बरी झाल्यानंतर मी दिनांक 21.11.2022 रोजी निकम मॅडम कार्यालयात हजर असल्याबाबत माहिती घेतली त्या कार्यालयात हजर असल्याबाबत माहिती पो.नि. गोर्डे यांना दिली त्यानुसार दिनांक 22.11.2022 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरले त्यानुसार दिनांक 22.11.2022 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर कार्यालयात हजर झालो, पो.नि.श्री. गोर्डे, त्यांचा स्टाफ व दोन्ही पंच हजर होते.

त्यानंतर वस्तु व सेवा कर विभाग अहमदनगर कार्यालयात श्रीमती निकम यांचेविरुध्द लाचेचा सापळा आयोजित

करण्याचे ठरले. दिनांक 19.10.2022 रोजी सुरक्षीत ठेवलेली लाच रक्कम पोना चैधरी यांनी पो.नि.गोर्डे यांचे सुचनेप्रमाणे त्या नोटाच्या नंबरची 19.10.2022 रोजी पंचनाम्यात नमुद लाच रकमेच्या नंबरषी पडताळणी करुन पाहिले असता त्याच नोटा असल्याची खात्री करण्यात आली, त्यानंतर पोना चैधरी यांनी सदर लाच रक्कम माझ्या पॅंटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिष्यात ठेवुन दिली,त्यानंतर पोनि श्री. गोर्डे यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड घालुन त्यात कोणतीही फाईल नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला, त्यानंतर मला व पंच नं.1 यांना श्रीमती निकम यांची भेट घेवुन त्यांनी लाच मागणी केलेली लाच रक्कम देण्यासाठी वस्तु व सेवा कर विभाग अहमदनगर कार्यालय येथे माझे कडील मोटार सायकलवरुन रवाना केले. आमचे पाठोपाठ पो.नि. श्री. गोर्डे व सापळा पथक त्यांचेकडील शासकिय वाहनाने निघाले, मी पंचासह वस्तु व सेवा कर विभाग अहमदनगर कार्यालया समोरील आवारात पोहोचलो. त्यानंतर सापळा पथक माझे पाठोपाठ आल्याची खात्री केली. त्यानंतर मी व पंच नं 1 असे श्रीमती निकम यांचे कार्यालयात गेलो,तेथे निकम मॅडम यांची भेट घेतली माझ्या बंद झालेला जी.एस.टी. नंबर पुन्हा कार्यान्वित करण्याबाबत चर्चा झाली, त्यावेळी मी निकम मॅडमला म्हणालो, तुम्ही मागच्या वेळेस सांगीतले होते ते असे बोलुन हाताने पैष्याबाबत इषारा केला असता त्यांना माझा काहीतरी संषय आल्याने त्यांनी नाही नाही तसलं काही नाही,जे काय आहे ते ऑनलाईन अपील करा असे बोलुन माझ्याकडुन त्यांनी माझा बंद झालेला जी.एस.टी. नंबर पुन्हा कार्यान्वित करुन देण्यासाठी त्यांनी मागणी केलेली 4000/- रुपये लाच रक्कम माझ्याकडुन स्वीकारली नाही. त्यानंतर मी तेथुन पंच नं 1 सह सापळा पथकास कोणताही इषारा न करता बाहेर आलो. कार्यालयाचे बाजुला आडोषाला पो.नि. गोर्डे यांनी माझ्या कडील व्हाॅईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केला,त्यानंतर मी व पंच नं 1 असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय,अहमदनगर येथे आलो, आमचे पाठोपाठ सापळा पथक देखील तेथे आले,त्यावेळी वरील प्रमाणे हकिकत मी व पंच नं1 यांनी पो.नि.गोर्डे यांना सांगीतली.श्रीमती निकम यांना माझा काहीतरी संषय आला असावा . शब्द संख्या जास्त असल्यामुळे सोबत मुळ फिर्याद जोडली आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SHISHIRKUMAR KAILASRAO DESHMUKH(SI (Sub-Inspector)) / 15101000402SKDM8701Y **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SHISHIRKUMAR KAIL
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 15101000402SKDM870

पोलीस ठाणे अंमलदार
भिंगार कॅम्प पो.स्टे.अ.नगर